**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२२४/२०२०</u>**

**सतिश विरुध्द राजाराम**

**CNR:MHSN14-00-2021**

## <u>नि.क्र. ३० वरील आदेश</u>

अर्ज व त्यावरील वादीतर्फे दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी नं. ५, ६, ९ ते १३ तर्फे सदरचा अर्ज त्यांच्या विरुध्द दावा विना कैफियत चालविण्याचा झालेला आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दिलेला आहे. प्रतिवादी तर्फे कैफियत दाखल करणेच्या दरम्यान कोरोनाची साथ सुरु होती व त्यानंतर बराच काळ लॉकडाऊन होते. त्यामुळे प्रतिवादींना त्यांचे वकीलांच्याशी योग्य वेळेत संपर्क साधून सदर कामासाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत त्याबाबतची मुदतीत माहिती घेता आली नाही व त्याबाबतची आवश्यक माहिती वकीलांना देखील देता आलेली नाही. त्यामुळे प्रतिवादींतर्फे त्यांची कैफियत व म्हणणे देण्यास विलंब झालेला आहे. प्रतिवादींच्या विरुध्द दावा विना कैफियत चालविण्याचा आदेश रद्द करुन त्यांना त्यांची कैफियत देण्याची संधी दिल्यास न्यायदानासाठी त्याचा उपयोग होणार आहे. त्यामुळे उभय पक्षापैकी कोणाचेही नुकसान होणार नाही. दावा गुणदोषांवर चालवून निकाली करणेतस मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक असल्याने प्रतिवादी नं. ५, ६, ९ ते १३ विरुध्द दिनांक २४/११/२०२१ रोजी पारीत केलेला विना कैफियत आदेश वादी यांना र.रु. १००/- कॉस्ट म्हणून देण्याच्या अटींवर रद्द करण्यात येतो. प्रतिवादी यांची कैफियत रेकॉर्डवर घेण्यात यावी.

PRITI ASHOK SHRIRAM Digitally signed by PRITI ASHOK SHRIRAM Date: 2022.06.29 10:49:24 +05'30'

शिराळा (**प्रीती अ. श्रीराम**)

दिनांक २८/०६/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा.

## <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V. S. Patil |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 28/06/2022 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 28/06/2022 |
| Judgment uploaded on | : | 29/06/2022 |